# विद्यार्थी व पालकांनी द्यावयाचे हमीपत्र

(टिप- निवडीनंतर सादर करावयाचे आहे.)

(रु. 500/- च्या स्टॅम पेपर वर करणे)

**मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या प्रवर्गातील मुलामुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी सयाजीराव गायकवाड- सारथी गुणवंत विद्यार्थी परदेश शिक्षण शिष्यवृत्ती योजनेसाठीचे (सन 2025-26)**

1.मी_________________________________________राहणार________________________________ येथे राहत असून माझी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत मराठा, कुणबी, कुणबी-मराठा, मराठा-कुणबी या प्रवर्गातील मुलामुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी सयाजीराव गायकवाड- सारथी गुणवंत विद्यार्थी परदेश शिक्षण शिष्यवृत्ती योजना या योजने अंतर्गत परदेशातील (देशाचे नाव)______________________________ येथे (विद्यापीठाचे नाव) ________________________________ या विद्यापीठात (कालावधी) _______ वर्षाच्या (अभ्यासक्रमाचे नाव)______________________________________ या अभ्यासक्रमासाठी सन__________ या वर्षाकरिता परदेश शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. त्या अनुषंगाने भी व्यवस्थापकीय संचालक सारथी, पुणे यांना खालीलप्रमाणे हमी देत आहे.

2. मी सद्यस्थितीत ____________________________ येथे नोकरीस असून सदर कार्यालयातील प्रशासकीय बाबी उदा. रजा, वेतन आणि इतर सेवेच्या बाबी या स्वतः प्रत्यक्षपणे निराकरीत करेल यासाठी कोणत्याही प्रकारची सवलत शासनाकडून घेणार नाही. (नोकरी करणासाठी लागू)

3. अर्जात नमुद केलेला अभ्यासक्रम विहीत कालावधीत पुर्ण करणे माझ्यावर बंधनकारक राहील. सदर अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी वाढीव कालावधीची मागणी करणार नाही.

4. मला शासनाने मंजूर केलेल्या परदेशातील विद्यापीठ व शैक्षणिक अभ्यासक्रमात मी परस्पर बदल करणार नाही.

5. अर्जासोबत सादर केलेले कागदपत्रे / प्रमाणपत्रे हे खोटे व बनावट असल्याचे आढळून आल्यास शिष्यवृत्ती पोटी मिळालेली सर्व रक्कम व्याजासह परत करण्याची हमी देत आहे.

6. सर्व मार्गांनी मिळणारे कुटुंबाचे उत्पन्न 8 लाखाच्या आत आहे. व सदर उत्पन्नांचे स्त्रोत पुढीलप्रमाणे आहेत. या व्यतिरिक्त उत्पन्नांचे स्त्रोत नाहीत.

1.----------------------------

2.----------------------------

3.----------------------------

7. कोणत्याही कारणास्तव अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास शासनातर्फे मला अदा करण्यात आलेली शिष्यवृत्तीची सर्व रक्कम व्याजासह कुटूंबाच्या मालकीच्या / जामिनदार यांच्या स्थावर मालमत्तेमधून एक रकमी भरपाई करण्याची अथवा वसुल करण्याची हमी देत आहे.

8. परदेशामध्ये शिक्षण घेत असतांना काही कारणास्तव राज्य शासनाच्या पूर्व परवानगीने परदेशातून भारतात काही कालावधीसाठी वास्तव्य केले असेल तर सदर कालावधीची शिष्यवृत्तीची रक्कम मला अनुज्ञेय होणार नाही.

9. परदेश शिष्यवृत्ती अंतर्गत परदेशात शिक्षण घेत असताना जास्तीची रक्कम शासनातर्फे मला अदा झाली असल्याचे निदर्शनास आल्यास त्याची परतफेड करेन. अथवा न केल्यास ती वसुल करणेबाबत प्रचलित कायदे व नियमानुसार कार्यवाहीस मी पात्र असेन.

10. मला शिक्षण की व इतर की, निर्वाह भत्ता व आकस्मिक खर्च यासाठी शासनाने निर्धारित केलेल्या दरापेक्षा कोणताही जास्तीचा खर्च अनुज्ञेय होणार नाही. निधारित दरापेक्षा होणारा जास्तीचा खर्च मी स्वतः अदा करेन.

11. परदेशातील प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमामध्ये प्रत्येक वेळी उत्तीर्ण होणे माझ्यावर बंधनकारक असून तसे शैक्षणिक संस्था/ विद्यापीठाचे प्रमाणपत्र गुणपत्रिका, प्रगती अहवाल प्रत्येक सत्रासाठी किंवा सहा महिन्यांसाठी आयुक्तालयास सादर करेन.

12. कोणतेही कारण अथवा सबबी सांगून अभ्यासक्रम पूर्ण न करणे, विहीत प्रयोजनासाठी खर्च न करणे, खर्चात काटकसर न करणे, विहीत लाग मर्यादेपेक्षा जास्तीची मागणी परदेशात जावून करणे, कोणत्याही प्रकारचा दबाव आणणे किंवा धमकी देणे, परदेश शिष्यवृत्ती नियमावलीतील तरतूदीचे उल्लंघन करणे, परदेशातील नियम / अटी /तरतूदींचे उल्लंघन करणे, वाममार्गास लागणे, परदेशातील शैक्षणीक कालावधीत कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य करणे व त्यासाठी दंड शिक्षा होणे, भारतीय राष्ट्रीयत्वास हानी पोहचवणे, भारताची बदनामी करणे या बाबी कर्तव्यातील कसूर समजण्यात येतील. कर्तव्यात कसूर केल्यास मला अपात्र ठरवून माझ्या परदेशी शिक्षणासाठी शासनाने दिलेले सर्व लाभ माझ्याकडून व्याजासह वसूल केले जातील.

13. परदेशातील अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर मी भारतात येवून माझ्या ज्ञानाचा उपयोग देशासाठी करेन.

14. कोणत्याही विद्यार्थ्यांनी/ उमेदवाराने खोटी माहिती / कागदपत्रे सादर केल्याचे सिध्द झाल्यास अथवा उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे कर्तव्यात कसुर केल्यास, त्यास ताबडतोब पुढील शिक्षणासाठी अटकाव (Debarr) केला जाईल व त्याच्याकडून झालेल्या खर्चाची 15 % चक्रवाढ व्याजाने वसूली करण्यात येईल. अशा विद्यार्थी / उमेदवाराचा काळया यादीत समावेश केला जाईल. तसेच प्रचलित कायद्यानुसार त्याच्या विरुध्द कारवाई करण्यात येईल. आणि त्यांनी दिलेले जामीनदार आणि संदर्भ अधिकारी/ व्यक्ती यांना सुध्दा ही बाब लेखी स्वरुपात कळविण्यात येईल. सदर प्रवेश प्रक्रिया गुणवत्तेवर आधारित असून कुठल्याही प्रकारचा राजकीय दबाव अथवा दबावतंत्र वापरल्यास संबंधित विद्यार्थ्यांस/ उमेदवारास काळया यादीत समावेश केला जाईल याची नोंद घ्यावी.

15. या संदर्भात कोणत्याही कायदेशीर बाबी उद्भवल्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात असतील. परदेशात उद्भवल्यास कायदेशीर बाबीसाठी परदेशातील उच्चायुक्त कार्यवाही करतील.

16. उपरोक्त नमूद केलेला सर्व मजकूर मला मान्य असून तो मी वाचून समजून घेऊन आज दिनांक / /2025 रोजी ___________ मुक्कामी सही केली असे, वरील बाबींचे माझ्याकडून उल्लंघन झाल्यास मी भारतीय दंड संविधान कलम 193 (2), 199, 200 व 406 अन्वये शिक्षेस पात्र राहील.

17. सदर शिष्यवृत्तीबाबत महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने सर्वंकष धोरणाने घेतलेला निर्णय अंतिम असून जाहिरातीमधील नमुद अटी व शर्तीमध्ये महाराष्ट्र शासनाकडून काही बदल झाल्यास त्या त्या वेळी लागू राहतील हे मला मान्य आहे.

स्थळ

दिनांक :  /  /2025

| | | |
|---|---|---|
| सही | सही | सही |
| (विद्यार्थी) (फोटो) | (पालक) (फोटो) | (जामीनदार) (फोटो) |
| संपूर्ण नांव व पत्ता | संपूर्ण नांव व पत्ता | संपूर्ण नांव व पत्ता |
| दूरध्वनी क्र. / मो.क्रं. | दूरध्वनी क्र. / मो.क्रं. | दूरध्वनी क्र. / मो.क्रं. |